# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:01.07.2025**

**वार:मंगळवार**

---

•राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर; महायोगी गुरु गोरखनाथ आयुष विद्यापीठाचं करणार उद्घाटन

•राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच जाहीर केलं जाणार, मंथन बैठकीत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांची घोषणा

•महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

•परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस.जयशंकर आज अमेरिकेत क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होणार

•व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत घट

आणि

•जुलै महिन्यात संपूर्ण देशभरात सरासरीपेक्षा जास्त पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**<u>मुर्मू</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उत्तर प्रदेशाच्या दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते आज पहिल्या महायोगी गुरु गोरखनाथ आयुष विद्यापीठाचे गोरखपूरमध्ये उद्घाटन होणार आहे. यावेळी राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित राहणार आहेत. या विद्यापीठाची पायाभरणी २८ ऑगस्ट २०२१ ला तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केली होती. हे विद्यापीठ ५२ एकरांवर उभं राहिलं असून त्यासाठी २६७ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मंजूर करण्यात आला होता.

विद्यापीठाच्या उद्घाटनानंतर, राष्ट्रपती मुर्मू गोरखनाथ मंदिरालाही भेट देतील. त्यानंतर त्या शैक्षणिक दालन, सभागृह आणि पंचकर्म केंद्राचं उद्घाटन करतील आणि सोनबारसा इथल्या महायोगी गोरखनाथ विद्यापीठाच्या आरोग्यधाम परिसरात मुलींच्या वसतिगृहाची पायाभरणी करतील.

**<u>अमितशहा</u>**

देशातल्या सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार मंत्र्यांची मंथन बैठक काल नवी दिल्लीत आयोजित करण्यात आली होती. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली

झालेल्या  या बैठकीत देशातील सहकारी चळवळीला बळकटी देण्यासाठी सुरु असलेल्या योजनांचा आढावा, घेण्यात आला. यावेळी बोलताना शाह म्हणाले की, सहकार क्षेत्रात प्रचंड संधी असून देशातील लाखो लहान शेतकरी आणि ग्रामीण भागातील लोककल्याणासाठी सहकाराचं  पुनरुज्जीवन करायला हवं. लवकरच राष्ट्रीय सहकार धोरण देखील जाहीर केलं जाणार  असून ते २०२५ ते २०४५ पर्यंत लागू असेल.असं सांगत शाह म्हणाले की, राष्ट्रीय सहकार धोरणांतर्गत, प्रत्येक राज्याचं सहकार धोरण त्या त्या  राज्याच्या सहकारी परिस्थितीनुसार तयार करण्या येईल. या बैठकीत महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी राज्यातल्या सहकार क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांचा आढावा घेतला.

**विधीमंडळ**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला काल प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर, यांच्यासह दिवंगत सदस्याना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पहिल्या दिवशी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने रस्ते, मेट्रो, पायाभूत सुविधा प्रकल्प, सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणी, महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, दुर्बल आणि वंचित समाजघटकांच्या विकासाकरता उपयोगात आणला जाणार आहे.

**एलपीजी**

व्यावसायिक वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत घट झाली आहे. नवी दिल्लीत ५८ रुपये ५० पैशांनी किंमत कमी झाली असून आता ती १ हजार ६६५ रुपये झाली आहे. दरम्यान, कोलकातामध्ये व्यावसायिक एलपीजीच्या किमतीत ५७ रुपये, मुंबईत ५८ रुपये आणि चेन्नईमध्ये ५७ रुपये ५० पैशांनी घट झाली आहे. घरगुती सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही अशी माहिती इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडनं दिली आहे.

**जीएसटी**

मुंबईतल्या करदाते सेवा महासंचालनालयाच्या वतीनं आज एक जुलैला वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटीचा आठवा वर्धापन दिन साजरा करण्यात  येणार  आहे. जीएसटीमुळं देशाच्या कर व्यवस्थेत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि स्थिरता आली असून कररचना सुलभ झाली आहे.

**नाईक**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांची आज जयंती असून त्यानिमित्ताने राज्यात १ जुलै हा दिवस कृषिदिन म्हणून पाळला जातो. या अनुषंगाने राज्यभरात विविध ठिकाणी नाईक यांना अभिवादन केलं जात असून विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>सितारामन</u>**

खाजगी गुंतवणूक ही भांडवल आणि उत्पादकता वाढवण्यासाठी, नवोन्मेषाला चालना देण्यासाठी आणि तंत्रज्ञानाच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी एक उत्प्रेरक शक्ती आहे असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी केलं. सर्व समावेशक आणि शाश्वत आर्थिक विकासासाठी हे सर्व घटक अत्यंत आवश्यक आहेत असं त्या म्हणाल्या. स्पेनमधील सेव्हिल इथं संयुक्त राष्ट्रांनी आयोजित केलेल्या विकासासाठी वित्तपुरवठा म्हणजे FFD4 या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्या काल बोलत होत्या.

**<u>क्वाड</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस.जयशंकर आज अमेरिकेत होणाऱ्या क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होणार आहेत. या बैठकीत प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर विशेषतः हिंद-प्रशांत क्षेत्राशी संबंधित बाबींवर ते चर्चा करतील. या बैठकीचं यजमानपद अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो हे भूषवणार असून यावेळी ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र मंत्री पेनी वोंग आणि जपानचे परराष्ट्र मंत्री इवाया ताकेशी देखील उपस्थित राहणार आहेत.

**<u>अमेरिकाव्यापारकरार</u>**

अमेरिकेतील व्हाईट हाऊसच्या प्रेस सचिव कॅरोलिन लेविट यांनी हिंद प्रशांत क्षेत्रात भारताच्या धोरणात्मक सहयोगी भूमिकेची प्रशंसा केली आहे. हिंद प्रशांत क्षेत्रातील चीनच्या प्रभावाबद्दल अमेरिकेचं मत काय आहे या प्रश्नाला उत्तर देताना लेविट म्हणाल्या की, भारत हा एक अतिशय धोरणात्मक सहयोगी असून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी खूप चांगले संबंध आहेत आणि ते यापुढेही राहतील.

अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार करार अंतिम टप्प्यात असून लवकरच आपल्याला अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्याकडून अधिक माहिती मिळेल असं लेवीट यांनी यावेळी सांगितलं.

**<u>महिला क्रिकेट</u>**

इंग्लंड आणि भारतीय महिला संघादरम्यान खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या टी -20 आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेतला दूसरा सामना आज इंग्लंडमधील ब्रिस्टल इथल्या काउंटी ग्राउंडवर होईल. नॉटिंगहॅममधील ट्रेंट ब्रिज इथं झालेल्या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतानं इंग्लंडचा ९७ धावांनी पराभव करून १-० अशी आघाडी घेतली आहे.

**<u>विम्बल्डन</u>**

२०२५ च्या विम्बल्डन विश्वकरंडक टेनिस स्पर्धांना लंडनमधील ऑल इंग्लंड क्लब इथं कालपासून सुरुवात झाली आहे. १३ जुलै रोजी पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यानं या स्पर्धांचा समारोप होईल. दोन वेळा पुरुष एकेरी सामन्यांमध्ये गतविजेता ठरलेल्या स्पेनच्या कार्लोस अल्काराझनं काल रात्री इटालियन फॅबियो फोग्निनीविरुद्ध पाच सेटचा सामना जिंकला.

या वर्षीच्या विम्बल्डनमध्ये पुरुष दुहेरीत चार भारतीय टेनिसपटू खेळणार आहेत. रोहन बोपण्णा बेल्जियमच्या सँडर गिलेसह तर युकी भांब्री अमेरिकेच्या रॉबर्ट गॅलोवे बरोबर खेळत आहे. रित्विक बोलीपल्ली आणि रोमानियाचा निकोलस बॅरिएंटो यांची जोडी असून एन. श्रीराम, बालाजी मेक्सिकोच्या मिगुएल रेयेस-वरेला बरोबर भागीदारी करणार आहे.

**<u>बॅडमिंटन</u>**

कॅनडा खुली बॅडमिंटन स्पर्धा आजपासून ओंटारियोमध्ये सुरू होत आहे. पुरुष एकेरीत आयुष शेट्टी आघाडीवर असून त्याची लढत शंकर सुब्रमनियनशी होईल. किदाम्बी श्रीकांतची लढत सातव्या मानांकित प्रियांशु राजावतशी होईल तर पात्रता फेरीत चिराग सेनची मलेशियाच्या इओजीन ईविशी होईल. महिला एकेरीत, तान्या हेमंत, श्रीयांशी वालिशेट्टी आणि इरा शर्मा आघाडी घेतील. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो ह्या अव्वल मानांकित खेळाडूंकडू भारताला पदकाची आशा आहे.

**<u>हवामान</u>**

जुलै महिन्यात संपूर्ण देशभरात पावसाचं प्रमाण मासिक सरासरीपेक्षा जास्त असेल आणि दीर्घकालीन सरासरीच्या १०६ टक्क्यांहून जास्त असेल असा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे.

देशातील बहुतेक भागात सामान्य ते मध्यम प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता आहे. परंतु ईशान्य आणि पूर्वेकडील बहुतेक भाग, दक्षिणेकडील द्वीपकल्पीय भाग आणि वायव्य भारतातील काही भागात या वर्षी जुलै महिन्यात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे अशी माहिती IMD चे महासंचालक मृत्युंजय मोहापात्रा यांनी काल दूरस्थ पद्धतीनं आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान उत्तराखंड मध्ये गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानं थोडी विश्रांती घेतली असल्यानं विविध भागातील रस्ते जलद गतीनं स्वच्छ करण्याचं काम सुरू आहे आणि रस्त्यांची दुरुस्ती वेगानं सुरू आहे. भूस्खलनामुळे राज्यातील शंभराहून अधिक ग्रामीण जोड रस्ते अजूनही बंद आहेत.

हवामान खात्याने पुढील दोन दिवसांत उत्तरकाशी, देहरादून, टिहरी, पौडी, रुद्रप्रयाग, नैनिताल आणि बागेश्वर जिल्ह्यांच्या काही भागात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

हिमाचल प्रदेशात ढगफुटी, भूस्खलन आणि मुसळधार पावसामुळे अनेक भागात दैनंदिन जीवन विस्कळीत झालं आहे. शिमला येथील हवामान केंद्रानं ६ जुलैपर्यंत येथील बहुतेक भागात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

**कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातही बहुतांश ठिकाणी पाऊस**

पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यातही काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार**